मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# विहिरी जवळ असलेली स्त्री

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Lazarus

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2017 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही तीं कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

येशू आणि त्याचे शिष्य शोमरोन नावाच्या विभागातून प्रवास करित होते. ते सूखार नावाच्या शहराजवळ आले.



तेथे एक विहिर होती, सूखार येथील लोक पिण्याचे पाणी घेण्यासाठी येथे येत असत. फार वर्षांपूर्वी इस्त्राएलांचा पिता याकोब याने हि विहिर खोदली होती.



भर दुपारी कदाचित उन असल्यामुळे वातावरण फार गरम असेल. शिष्य सूखारमध्ये अन्न विकत घ्यायला गेले तोवर चालून चालून दमलेला येशू त्या विहिरी जवळ बसला.





येशू सोबत कोणीच नव्हते; पण जास्त
वेळ पर्यंत तो एकटाच राहिला नाही.
सूखार मध्ये राहणारी एक
स्त्री पाणी भरण्यासाठी
तेथे आली. येशू
तिला म्हणाला,

"मला प्यावयाला
पाणी दे."

त्या स्त्रीला नवल वाटले, तिने येशूला म्हटले, "आपण यहुदी असतां माझ्यासारख्या शोमरोनी स्त्रीजवळ प्यावयाला पाणी मागता हे कसे?" त्या दिवसांत यहुदी लोक शोमरोनी लोकांबरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार करित नसत.



"मी कोण आहे हे जर
तुला कळले असते,
तर तूं माझ्याजवळ
जिवंत पाणी मागितले
असते." असे जेंव्हा
येशूने तिला म्हटले
तेंव्हा तर तीला
जास्तच नवल वाटले.



आणि ती स्त्री येशूला म्हणाली, "महाराज पाणी काढावयास आपणांजवळ काहीच साधन नाही व विहीर तर खोल आहे, मग ते जिवंत पाणी आपणाजवळ कोठून? ... आमचा पूर्वज याकोब याच्यापेक्षा आपण मोठे आहांत काय?"



येशूने तिला उत्तर दिले, "जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल. परंतू मी देईन ते पाणी जो कोणी पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही; जे पाणी मी त्याला देईन ते त्याच्यामध्ये सार्वकालिक जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा असे होईल." ती स्त्री येशूला म्हणाली, "... ते पाणी मला द्या."



येशूने तिला म्हटले, तूं जाऊन आपल्या नवऱ्याला बोलावून आण. त्यावर ती स्त्री म्हणाली, "मला नवरा नाही." मग येशूने तिला म्हटले, "तुला पाच नवरे होते, आणि आता जो तुझ्याबरोबर आहे तो तुझा नवरा नाही."



येशू संदेष्टा आहे हे त्या स्त्रीने ओळखले. तेंव्हा देवाची भक्ति कुठे करावी; यरुशलेमात किंवा शमरोनातील पवित्र डोंगरावर? याविषयी ती वाद करण्याचा प्रयत्न करु लागली. येशूने म्हटले, खरे उपासक आत्म्याने व खरेपणाने पित्याची उपासना करतात.



ती स्त्री येशूला म्हणाली, "मशीहा येणार आहे हे मला माहित आहे, तो आल्यावर आम्हांला सर्व गोष्टी सांगेल." येशू तिला म्हणाला, "जो तुझ्याबरोबर बोलत आहे तो मी तोच आहे." इतक्यांत त्याचे शिष्य आले. त्या स्त्रीने तिची महागडी घागर तेथेच राहू दिली आणि ती शहरात परतली.



ती सूखार शहरातील लोकांना म्हणाली, "चला, मी केलेले सर्व काही ज्याने मला सांगितले, तो मनुष्य पाहा; तोच ख्रिस्त असेल काय?" तेंव्हा ते लोक शहरातून निघून येशूला पाहण्यासाठी गेले.



दरम्यानच्या वेळेत, शिष्यांनी येशूला जेवण करण्यास विनंती केली. परंतू येशू त्यांना म्हणाला, "ज्याने मला पाठविले त्याच्या इच्छेप्रमाणे करावे व त्याचे कार्य सिध्दीस न्यावे हेच माझे अन्न आहे." लोकांना देवाकडे आणणे हे त्याचे कार्य होते.



त्या स्त्रीच्या बोलण्यावरुन त्या शहारातील पुष्कळ शोमरोनी लोकांनी त्याच्यावर विश्वास ठेवला.



त्यांनी येशूला त्यांच्याबरोबर राहण्याची विनंती केली; आणि दोन दिवस येशू त्यांच्याबरोबर तेथे राहिला.

येशूने सांगितलेल्या वचनावरुन आणखी कितीतरी लोकांनी विश्‍वास धरला. ते म्हणाले, "... आम्ही स्वतः



ऐकले आहे व हा खरोखर ख्रिस्त, जगाचा तारणारा आहे हे आम्हांला कळले आहे."

विहिरी जवळ असलेली स्त्री

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

योहान ४

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०


समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गातल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!
जॉन 3:16